# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक २३३/२०२४** **दिनांक-२१/०६/२०२४**

## ५० हजार रुपये बक्षीस असलेला उत्तरप्रदेश राज्यातील २ वर्षापासुन फरार असलेला मुख्य आरोपी यास ताब्यात घेण्यास नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश.

उत्तरप्रदेश राज्य जिल्हा- अयोध्या मधील कोतावली पोलीस ठाणे हद्दीमध्ये आरोपीत नामे १) रहीमुल्ल अन्सारी रा. सितामडी, उत्तरप्रदेश, २)उपेन्द्र सोनी राहणार-जनपद बलरामपुर उत्तरप्रदेश, ३) रोहीत पांडे रा. जनपद बस्ती उत्तरपदेश व ४) शेखर मिश्रा रा. जनपद बस्ती,उत्तरपदेश याची गॅग असुन आरोपीत नामे रहीमुल अन्सारी हा गॅगचा मुख्य असुन वरील सर्व आरोपीत मिळुन चारचाकी गाडीच्या काच फोडुन त्यामधुन गाडीमध्ये ठेवलले रोख्र रक्कम, लॅपटॉप, किंमती वस्तु चोरी करत असल्याबाबत कोतावली पोलीस ठाणे (उत्तरप्रदेश) येथे ०२ गुन्हे व कैट पोलीस ठाणे (उत्तरप्रदेश) येथे एक गुन्हा दाखल असुन सदर आरोपीत यांच्याविरुध्द स्थानिक लोक यांच्याविरुध्द साक्ष देण्यास भित असल्याने मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे सदर आरोपीत यांच्याविरुध्द गॅग ॲक्टप्रमाणे कारवाई करण्याबाबत परवानगी घेवुन वरील आरोपीत यांच्याविरुध्द कोतावली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री देवेन्द्र पांडे यांनी कोतावली पोलीस ठाणे (उत्तरप्रदेश) गुन्हा रजि नं । २४४/२०२२ उ.प्र.गिरोह वन्द व समाजविरोधी क्रियाकलाप निवारण अधिनियम १९८६ चे कलम ३ (१) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. **सदर गुन्हयातील आरोपी नामे रहिमुल अन्सारी हा गेले ०२ वर्षापासुन फरार होता. तसेच ०२ वर्षापासुन फरार असल्याने त्यास पकडणा-या ५० हजार रुपयाचे बक्षीस जाहिर करण्यात आले होते.**

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने एस.टी.एफ., उत्तरप्रदेश राज्य (फिल्ड युनीट प्रयागराज) यांनी सदर आरोपीत हा नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येथील कामन चिचोंटी परिसरात राहण्यास आला असल्याबाबत खात्रिशीर माहिती मिळाल्याने सदर आरोपीत यांचा शोध घेण्याकामी नायगाव पोलीस ठाणे येथे पोलीस मदत मागतिल्याने सदर गुन्हयाचे गंभीर्य लक्षात घेता मा. वरिष्ठांच्या आदेशाने नायगाव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटिकरण शाखा व एस.टी.एफ., उत्तरप्रदेश राज्य (फिल्ड युनीट प्रयागराज) यांच्या दोन वेगवेगळे पथके बनवुन सदर आरोपीत यांचा कसुन शोध घेत असताना गुप्त बातमीव्दार व तांत्रिक माहितीच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपीत यास साडी कम्पाऊण्ड, चिचोंटी परिसरातुन ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता सदर आरोपीत यांने त्यांचे नाव रहीमुल ईब्राहीम अन्सारी, वय-३२ वर्षे रा. रुम नं ०६, चाळ नं ०४, पाटीलपाडा, चिचोंटी, ता. वसई जि. पालघर असे असुन सदर आरोपीत यांच्याकडे वर नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने कौशल्यपुर्ण चौकशी केली असता वरील गुन्हाची कबुली दिल्याने सदर आरोपीत यास पुढिल योग्य त्या कायदेशीर कार्यवाही करीता उत्तरप्रदेश पोलीसांच्या ताब्यात दिला आहे.

- **आरोपीत नामे रहीमुल ईब्राहीम अन्सारी यांच्याविरुध्द तुळीज पोलीस ठाणे, नालासोपारा पोलीस ठाणे, अर्नाळा पोलीस ठाणे, मणिकपुर पोलीस ठाणे, वसई पोलीस ठाणे व विरार पोलीस ठाणे येथे सन २०१६ मध्ये एकुण २७ गुन्हे दाखल आहेत.**

सदरची कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, पोलीस निरीक्षक मंगेश अंधारे (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/गणेश केकान, सपोनि/रोशन देवरे, पो.अंम/सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, मसुब/सिध्देश्वर क्षिरसागर व ए.टी.एफ पथक प्रयागराज (राज्य उत्तरपद्रेश) यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

